

सर्व सुजान मतदारांनी आपला मतदानाचा हक्का बजावावा...

http://lokadesh.in

मूल्य १ रु.

# लोकादेश

■ महाराष्ट्र शासन जाहिरात मान्यताप्राप्त साप्ताहिक ■

मुख्य संपादक : साजीद बडगुजर

RNI No. MAHMAR/2007/20732

किनवट, वर्षे १७ वे, अंक ४७ वा, सोमवार, दि.१८ नोव्हेंबर २०२४, पाने ०४

Post Regd.NO G-2/RNP/NND -323/2023-2025

# किनवट विधानसभा निवडणूकीसाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज

## मतदार संघातील सर्व मतदारांनी लोकशाहीच्या उत्सवात सहभागी होवून मतदानाचा हक्क बजावावा-कावली मेघना (भा.प्र.से.)




**लोकादेश न्यूज किनवट : विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करिता ८३-किनवट विधानसभा मतदारसंघात बुधवारी (ता.२० नोव्हेंबर) रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजे पर्यंत ३३१ मतदान केंद्रावर मतदान यंत्राद्वारे निर्भय, निःपक्ष व मुक्त वातावरणात मतदान घेण्यासाठी पोलिस अधिकारी -कर्मचा-यांच्या तैनातीसह अधिकारी, कर्मचारी यांचेसह प्रशासकीय यंत्रणा सज्ज असल्याचो सहायक जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी मेघना कावली (भाप्रसे) यांनी सांगितले. दि.२० नोव्हेंबर २०२४ रोजी निवडणुकीसाठी मतदान होणार आहे. या मतदारसंघातील सर्वाच मतदारांनी लोकशाहीच्या या उत्सवात सहभागी होवून मतदानाचा हक्क बजावावा. असेही निवडणूक निर्णय अधिकारी यांनी सांगीतले.**

किनवट व माहूर या तालुक्याचा समावेश असलेल्या या विधानसभा मतदारसंघात १ लाख ४२ हजार २७३ पुरुष, १ लाख ३६ हजार ३८१ स्त्री व ११ ईतर असे एकूण २ लाख ७८ हजार ६६५ मतदार आहेत.

दिव्यांगासाठीच्या सुलभ निवडणुका अंतर्गत तिथे सर्व सुविधा उपलब्ध राहणार आहेत. पांगरपहाड हे १ मतदान केंद्र संवेदनशील आहे. तसेच नव्याने वाघदरी या मतदान केंद्राची वाढ करण्यात आली आहे.

औद्योगिक प्रशिक्षण संस्था परिसरातील निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयातून निवडणूक निर्णय अधिकारी तथा सहायक जिल्हाधिकारी मेघना कावली, तहसिलदार (किनवट) सहायक निवडणूक निर्णय अधिकारी डॉ.शारदा चौंडकर, तहसिलदार, (किनवट), किशोर यादव (माहूर), मुख्याधिकारी डॉ.अजय कुरवाडे हे मतदान पथके रवाना करतील. किनवट मतदार संघासाठी मातोश्री कमलताई ठमके इंग्लिश स्कूल कोठारी चि. किनवट येथे कर्मचा-यांच्या निवास व्यवस्था करण्यात आली आहे.

**चोख पोलिस बंदोबस्त**

उपविभागीय पोलिस अधिकारी रामकृष्ण मळघणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस विभागाच्या वतीने मतदानासाठी पोलिस उपअधिक्षक, पोलीस निरिक्षक, सहायक पोलिस निरीक्षक व पोलिस उपनिरीक्षक, अधिकारी, पोलीस कर्मचारी, होमगार्ड यांचा चोख पोलिस बंदोबस्त राहणार आहे.

# आज संध्याकाळी प्रचारतोफा थंडावणार

## सोमवारी सायंकाळी ६ वाजेपासून ४८ तासाच्या शांतता कालावधीला सुरुवात

## जिल्ह्यामध्ये प्रतिबंधात्मक आदेश लागू; सर्वत्र चोख बंदोबस्त

**नांदेड दि. १७ नोव्हेंबर :- १६-नांदेड लोकसभा पोट निवडणूक व विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या शेवटच्या ४८ तासाला उद्या सोमवारी सायंकाळी ६ वाजता प्रारंभ होणार आहे. ४८ तासांसाठी सर्व राजकीय पक्षांना आपला प्रचार थांबावावा लागणार असून २० नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी सात ते सायंकाळी सहापर्यंत मतदान होणार आहे. सर्वत्र चोख बंदोबस्त करण्यात आला असून निर्भय व पारदर्शी वातावरणात मोठ्या संख्येने नागरिकांना मतदान करण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.**



जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये प्रमाणे लोकसभा पोटनिवडणूक व विधानसभा मतदारसंघांमध्ये मतदानाच्या समाप्तीसाठी निश्चित केलेल्या वेळेच्या ४८ तासा अगोदरच्या कालावधीमध्ये कलम १६३ लागू होईल. याची नोंद घेण्याचे आवाहन केले आहे. या काळात सार्वजनिक सभा आयोजित करता येणार नाही. ध्वनिक्षेपकाचा वापर करता येणार नाही. बेकायदेशीररित्या जमा होता येणार नाही. पाच पेक्षा जास्त व्यक्ती एकत्रित जमा होता येणार नाही किंवा एकत्रित फिरता येणार नाही, सोशल मिडीया, इलेक्ट्रानिक मिडीयामध्ये आवाहन करता येणार नाही, जाहिराती देता येणार नाही, असे स्पष्ट केले आहे.

**नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीसाठी एकूण मतदार**

नांदेड लोकसभा मतदारसंघांमध्ये भोकर (३०३१०३), नांदेड उत्तर (३५८९१८), नांदेड दक्षिण (३१६८२१), नायगाव (३१०३७५), देगलूर (३१२२३७), मुखेड (३०७०९२) असे एकूण १९ लक्ष ८ हजार ५४६ मतदार यावेळी मतदानाचा अधिकार बजावणार आहेत. यामध्ये पुरुष ९ लक्ष ७८ हजार २३४ तर महिला ९ लक्ष ३० हजार १५८ तर १५४ तृतीय पंथीचा असे एकूण १९ लाख ८ हजार ५४६ मतदाराचा समावेश आहे.

**नांदेड विधानसभा मतदार संघात एकूण मतदार**

नांदेड विधानसभा मतदारसंघात किनवट (२७८६६५), हदगाव (२९९०८६), भोकर (३०३१०३), नांदेड उत्तर (३५८९१८), नांदेड दक्षिण (३१६८२१), लोहा (३०१६५०), नायगाव (३१०३७५), देगलूर (३१२२३७), मुखेड (३०७०९२) यामध्ये पुरुष १४ लक्ष ३० हजार ३६५ तर महिला १३ लाख ५७ हजार ४१० तर तृतीयपंथी १७२ असे एकूण २७ लाख ८७ हजार ९४७ मतदाराचा समावेश आहे.

**३ हजार ८८ केंद्र ; ५ संवेदनशील**

जिल्ह्यामध्ये मतदान केंद्राची संख्या एकूण हजार आहे. मतदान केंद्रांचे ठिकाण १९९२ आहे यामध्ये शहरी मतदान केंद्र ३९६ व ग्रामीण १५९६ केंद्र आहेत. जिल्ह्यामध्ये १०० टक्के मतदान अधिकारी महिला असलेले, १००टक्के मतदान अधिकारी दिव्यांग असलेले, तर १०० टक्के मतदान अधिकारी युवा असलेले मतदान केंद्र प्रत्येकी ९ आहेत. याशिवाय जिल्ह्यात संवेदनशील मतदान केंद्रही आहेत. यामध्ये किनवट मधील पांगरपाड, हदगाव मधील चोरंबा, भोकर मधील पाकी तांडा, देगलूर मधील रामतीर्थ, मुखेड मधील कोलेगाव केंद्राचा समावेश आहे. या ठिकाणी केंद्रीय राखीव दलाचे कर्मचारी तैनात केले जाणार आहे. जिल्ह्यामध्ये कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी उद्यापासूनच पोलीस दल कार्यरत होणार आहे. जिल्ह्यातील निवडणुका शांततेत व सुखद अनुभवाच्या ठराव्यात यासाठी २१ हजारावर कर्मचारी तैनात केले गेले असून त्यांना प्रशिक्षित करण्यात आले आहे. जिल्हा प्रशासनाने लोकसभा पोटनिवडणूक लक्षात घेऊन या संदर्भात आधीच नियोजन केल्यामुळे कर्मचाऱ्यांची तरतूद मुबलक प्रमाणात करण्यात आली आहे.

**बुथ व्यवस्थापन महत्वाचे**

यासोबतच राजकीय पक्षांनी निवडणूक बूथ कुठे उभारावे, बुथवर कशी व्यवस्था असावी, त्या ठिकाणचे बॅनर बैठक व्यवस्था व गर्दीचे व्यवस्थापन या संदर्भातील निर्बंध जारी करण्यात आले आहे. मतदान केंद्राजवळ शस्त्र बाळगणे किंवा शस्त्र प्रदर्शन करणे प्रतिबंधित आहे.

**कडेकोट बंदोबस्त**

जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या मार्गदर्शनात जिल्ह्यात चोख बंदोबस्त करण्यात येत आहे. केंद्रीय राखीव दलाच्या पोलीस पथकांसह ठीकठिकाणी पोलीस पथके बंदोबस्तासाठी तैनात करण्यात आली आहे. निवडणूक केंद्रावरही कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे.

**राजकीय नेत्यांच्या उपस्थितीवर निर्बंध**

प्रचाराचा कालावधी संपल्यामुळे ४८ तासापूर्वी मतदारसंघाबाहेरील राजकीय नेते, कार्यकर्ते यांनी मतदारसंघ सोडावा, असे आवाहन करण्यात आले आहे. प्रचार कालावधी संपल्यामुळे या जिल्ह्याचे, मतदार संघाचे मतदार नसलेले, राजकीय कार्यकर्ते पक्षाचे कार्यकर्ते, निवडणुकीतील कार्यकर्ते, मोहिमेचे कार्यकर्ते यांची उपस्थिती प्रतिबंधित करण्यात आली आहे.

**मोबाईल वापरावर बंदी**

मतदारांसाठी महत्त्वपूर्ण सूचनेद्वारे जिल्हाधिका-यांनी स्पष्ट केले आहे की, आयोगाने ज्यांना अधिकारी दिले आहे त्यांच्या व्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीला मतदान केंद्राच्या शंभर मीटर परिघात, मतदान केंद्रात शेजारील परिसरात आणि मतदान केंद्रामध्ये मोबाईल वापरण्यास बंदी करण्यात आली आहे. उमेदवार, त्यांचे प्रतिनिधी, पोलिंग एजंट, मतदार तसेच माध्यम प्रतिनिधींनी देखील याची नोंद घ्यावी. कोणालाही मोबाईल घेऊन मतदान केंद्रात प्रवेश नाही, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

**सार्वजनिक सुट्टी ; बाजार बंद**

२० नोव्हेंबर रोजी मतदान होत असून या दिवशी केवळ मतदानासाठी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. ज्या अत्यावश्यक व खाजगी आस्थापना दुकाने, रेस्टॉरंट या काळात सुरु असतील त्या ठिकाणाच्या सर्व व्यवस्थापनांनी कर्मचा-यांना किमान दोन तासाची सुटी द्यावी, असे आदेश कामगार आयुक्त मार्फत जारी करण्यात आले आहे. जिल्ह्यातील सर्व आठवडी बाजार बुधवार २० नोव्हेंबर रोजी बंद ठेवण्यात आले आहे. ज्या ठिकाणी आठवडी बाजार होते त्या ठिकाणीचे बाजार दुसरे दिवशी घेण्यात येणार आहे.

**४८ तास मद्य विक्री बंद**

कायदा सुव्यवस्थेसाठी सोमवारच्या सायंकाळी सहा वाजता पासून मतदान पूर्ण होईपर्यंत ४८ तास मद्य विक्री बंद करण्यात आली आहे.

**रेडिओ संदेश बल्क एसएमएस, सोशल मिडीया प्रसिध्दीस बंदी**

४८ तासाच्या शांतता काळामध्ये आकाशवाणी, सोशल मिडीयावरील व खाजगी चॅनलवरील निवडणूक विषयीच्या बाबीचे प्रसारण बंद करण्याचे निर्देशही जिल्हा प्रशासनाने दिले आहेत. तसेच मोबाईल वरील बल्क एसएमएस सेवाही या काळात बंद ठेवण्याचे निर्देशित करण्यात आले आहे.

**पुढील बाबींवर प्रतिबंध असणार नाही**

घरोघरी प्रचार करता येईल तथापि ही संख्या पाच पेक्षा जास्त नसावी. दवाखानाच्या गाड्या, ब्युलन्स, दुधगाड्या, पाण्याचे टँकर, विद्युत विभाग, पोलीस निवडणूक कर्मचा-यांचे व निवडणूक कर्मचा-यांचे वाहन, विहित मार्गाने जाणा-या बसगाड्या, शाळेला जाणारी वाहने यावर बंदी असणार नाही.



सौजन्य : किनवट नगर परिषद,किनवट जि.नांदेड

# मताधिकार ही भविष्य घडविण्याची संधी!

## प्रत्येक नागरिकाने आपला मतदानाचा अधिकार बजावून पुढील पिढ्यांमध्ये या जबाबदारीविषयी सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करणे गरजेचे आहे

**शासनव्यवस्था आणि तंत्रज्ञान या दोन मानवनिर्मित गोष्टी सर्वव्यापी होत चालल्या आहेत. कधी प्रत्यक्षपणे तर कधी अप्रत्यक्षपणे! अलीकडे त्यांच्या सर्वव्यापकतेला परिणामकारक आयाम प्राप्त होतो आहे. शासनव्यवस्था कशी आहे यावर नागरिकांचे जीवन सुखकर होणे अवलंबून असते. त्याचे कारण शासन व्यवस्थेच्या निर्णयांचा आणि अंमलबजावणीचा परिणाम नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे होतच असतो. उदाहरणार्थ, एखाद्याच्या राहण्याच्या ठिकाणापासून कामाच्या ठिकाणापर्यंत पोहोचणे वेळ, श्रम आणि वृत्ती यांच्या निकषांवर सुखकर होत नसेल तर शासनव्यवस्थेच्या निर्णयांना आणि अंमलबजावणीला जबाबदार धरावे लागेल. शासन व्यवस्थेमध्ये दिल्लीपासून गल्लीपर्यंतच्या सर्व शासकीय-निमशासकीय यंत्रणा आणि शासनप्रणीत महामंडळांचा आणि इतर संस्थांचाही समावेश होतो. हाच मुद्दा कळीचा आहे.**

शासन व्यवस्था कोणी चालवावी याचा निर्णय आपल्यालाच घ्यायचा आहे, हे दैनंदिन जीवनात काही त्रास झाल्यावर शासनाच्या नावाने खडे फोडणाऱ्यांना लक्षात येत नाही. दिवाणखान्यात रंगणा-या अनेक चर्चांमध्ये शासनाच्या निर्णयावर किंवा अंमलबजावणीवर हिरिरीने टीका करणा-यांनी हे समजून घ्यायला हवे. हेच लोक मतदानाच्या दिवशी स्वतःचा मताधिकार वापरणे टाळतात, तेव्हा त्यांचा दांभिकपणा उघडा पडतो. शासक आणि शासित यांमधल्या शासितांना आपल्यामधून शासक निवडण्याचा अधिकार आणि प्रसंगी ते बदलण्याचा अधिकार भारतीय राज्यघटनेने दिला आहे. त्यासाठीच निवडणूक प्रक्रिया घडते. मतदानाच्या दिवसाला जोडून सुट्ट्या आल्या की मुलांबाळांसह बाहेरगावी पळण्याची संधी साधणारा वर्ग आपण काय गमावतो आहोत, याविषयी अनभिज्ञ असतो असे मानायचे का? आपल्या पुढच्या पिढीपुढे कोणते आदर्श ते ठेवत असतात? उच्च उत्पन्न आणि उच्चशिक्षित शहरी समाज घटकांमध्ये मतदानाविषयीची अनास्था आकडेवारीवरून स्पष्ट होते. ही चिंतेची बाब आहे. शासक निवडण्याच्या या प्रक्रियेमध्ये आपले मत प्रतिबिंबित व्हावे, म्हणून प्रत्येकच घटकाने प्रयत्न केले पाहिजेत. जास्तीत जास्त मतदान केले पाहिजे.

भारतीय राज्यघटनेने प्रत्येक प्रौढ भारतीय नागरिकाला दिलेला मतदानाधिकार हा जणू एक दिवा आहे आणि प्रत्येकाने त्या दिव्याच्या प्रकाशात वाटचाल करणे घटनेला अपेक्षित आहे. जो नागरिक मतदान करत नाही, तो ही प्रकाशातली वाटचाल नाकारतो असे म्हणावे लागेल. निवडणूक आयोगाने मतदानाच्या आकडेवारीचे पृथक्करण करून मतदानाविषयी औदासीन्य दाखवणा-या घटकांची यादी केली आहे आणि यापूर्वीच्या निवडणुकांतील मतदानाच्या आकडेवारीवरून क्षेत्रनिश्चितीसुद्धा केली आहे. शहरी भागांतील मतदार, युवा मतदार, निम्न उत्पन्न गटातील मतदार असे काही घटक त्यामध्ये समाविष्ट आहेत. औद्योगिक क्षेत्रांत राहणारे मतदार मतदानाच्या हक्कापासून वंचित राहू नयेत म्हणून त्यांना वेतनी सुट्टी देण्याचे निर्देश आहेत. आदिवासी आणि भटक्या जमातींमधील मतदारांसाठी विशेष प्रयत्न चालू आहेत. महिलांमधील मतदानाचे प्रमाण वाढावे म्हणून उपाययोजना करण्यात येत आहेत. हा विषय केवळ प्रचार-प्रसिद्धीचा नसून मतदानाची भावना मनःपूर्वक निर्माण होण्यासाठी जाणकारांचे योगदान गरजेचे आहे. स्वतःचे उदाहरण आणि इतरांना



**भारतातील निवडणूक प्रक्रिया वर्षानुवर्षांच्या अनुभवातून विकसित झाली आहे आणि कालपरत्वे त्यात भर पडते आहे. प्रत्येक नागरिकाने आपला मतदानाचा अधिकार बजावून पुढील पिढ्यांमध्ये या जबाबदारीविषयी सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करणे गरजेचे आहे.**

मतदानास प्रवृत्त करून प्रत्येकच सुजाण भारतीयाने लोकशाहीच्या उत्सवातली आपली जबाबदारी पार पाडायला हवी. भारतीय नागरिक म्हणून आपल्या सर्वांना हे आवाहन आहे आणि आव्हानसुद्धा!

वेगवेगळ्या पातळ्यांवर म्हणजे देश, राज्य आणि स्थानिक पातळीवर आपले शासक कोण असावेत, हे ठरवण्याचा अधिकार मतदार म्हणून निवडणुकीद्वारे मिळतो. शासनव्यवस्थेत सहभागी होण्याची ही मतदारांसाठी संधी असते. माझ्या एका मताने काय फरक पडणार आहे, ही वृत्ती मतदानप्रक्रियेविषयी औदासीन्य दाखवते. थेंबाथेंबाने जर तळे साचून जलसंचय होतो, तर एकेका मताने जनमन तयार होऊन आपले शासक कोण असावेत, याचा कौल ठरतो. भारतीय राज्यघटनेने आपल्या समाजाला शासन व्यवस्थेत सहभागी होण्याची ही संधी दिली आहे आणि ती भेदभावरहित संधी सर्वांना दिली आहे. त्यासाठीची सुव्यवस्थित अंमलबजावणी करणारी यंत्रणा दिल्लीपासून गल्लीपर्यंत मेहनत करते. अशी परिस्थिती जगातल्या सर्व समाजांसाठी आहे, असे म्हणण्याजोगी स्थिती नाही. म्हणूनच भारतीय राज्यघटना हे आपले वैभव आहे आणि त्यातला सर्व प्रौढ भारतीयांसाठीचा मताधिकार आपला अभिमान आहे. हा मताधिकार सहजी मिळालेला नाही. आपल्या आधीच्या अनेक पिढ्यांचे त्यासाठी योगदान आहे. महापुरुषांची दूरदृष्टी आहे. धर्म, जात, पंथ, लिंग इत्यादी कोणत्याही भेदाच्या पलीकडे जाऊन समतेसाठी झटणाऱ्या अनेकांच्या रक्ताचा, घामाचा आणि अश्रूंचा गंध त्यात आहे. भारतातील निवडणूक प्रक्रिया वर्षानुवर्षांच्या अनुभवातून विकसित झाली आहे आणि कालपरत्वे त्यात भर पडते आहे. महाकाय देशासाठी काटेकोर निवडणूकप्रक्रिया राबवणे हे एक आव्हानच आहे आणि नागरिक या महत्त्वाच्या सहभागी घटकाच्या सक्रियतेमध्ये त्याचे फलित आहे. म्हणूनच सर्वच समाजघटकांतील नागरिकांनी लोकशाहीच्या या उत्सवात सहभागी होणे गरजेचे आहे. देशासाठी म्हणूनच नव्हे तर स्वतःसाठीसुद्धा! कारण देश म्हणजे देशातील माणसे! केवळ भौगोलिक सीमा नव्हेत, तर माणसांचा जिवंत समूह! मताधिकाराचा इतिहास अनेक चांगल्या वाईट घडामोडींनी भरलेला आहे. त्या घडामोडींचा निष्कर्ष म्हणून आज आपण मताच्या अधिकाराचे धनी झालो आहोत. आपल्या दैनंदिन जीवनातल्या हातभर तक्रारींचे ते बोटभर उत्तर आहे. मतदानाचा अधिकार बजावणे म्हणजे घटनेमधील समतेच्या तत्त्वाचे अभिनंदन! घटनाकारांच्या भविष्यदर्शी दृष्टीला वंदन! सुशासनाच्या आकांक्षेचे मंडन! मतदानाविषयीचे औदासीन्य झटकून आपण सारे मतदान करू या. या देशाचे सुजाण नागरिक म्हणून आपले कर्तव्य बजावू या. इतरांनाही मतदान करायला सांगू या. योग्य लोकप्रतिनिधी निवडून आपले आणि पुढच्या पिढ्यांचे भविष्य सुनिश्चित करू या. परदेशी जाऊन आलेल्या, विशेषतः पाश्चिमात्य देशांमध्ये जाऊन आलेल्या भारतीय नागरिकांमध्ये तिथल्या सुविधांचे कौतुक करण्याची वृत्ती कित्येकदा आढळते. आपल्या देशातल्या सुविधांची तुलनाही कित्येकदा तिकडच्या सुविधांशी केली जाते. हे करताना आपले शासक आपणच निवडलेले आहेत, या तत्त्वाचा त्यांना विसर पडलेला दिसतो. मतदानाच्या दिवशी हीच मंडळी मिळालेल्या सुट्टीचा फायदा घेऊन इतर गोष्टी करतात पण मतदानाचे कर्तव्य मात्र बजावत नाहीत, असे अनेकदा दिसून येते. मतदानाच्या दिवशी मिळणारी सुट्टी ही मतदानाचा अधिकार बजावता यावा म्हणून मतदाराला मिळालेली कामापासून दूर राहण्याची मुभा असते. या सुट्टीचा इतर कारणांसाठी उपयोग ही फसवणूकच म्हणायची. सुट्टी देणा-यांची आणि स्वतःचीही!

घटनेने मोठ्या उमेदीने सर्व प्रौढ भारतीय नागरिकांच्या हातात मताधिकार दिलेला आहे. सामान्य भारतीय मतदार या विशालकाय देशामध्ये विविध प्रांतांत, शहरांत, गावखेड्यांत वेगवेगळ्या परिस्थितीत राहत असतो. विविध प्रकारच्या सामाजिक आणि आर्थिक विषमतेच्या पलीकडे जाऊन सर्व भारतीय नागरिकांना बांधणारा मताधिकार हा समानतेचा धागा आहे. भारतीय म्हणून मताधिकार बजावून सर्वांनीच एकजूट दाखवणे आवश्यक आहे. विशेषतः उच्च उत्पन्न गटातील व्यक्तींनी आणि सुशिक्षितांनी हा मुद्दा लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. मतदान ही केवळ एक कृती नाही. लोकशाहीप्रति आणि निवडणूक प्रक्रियेबद्दल आदरभावना व्यक्त करण्याची ती एक संधी आहे. याचा मतदाराच्या घरातील मुलाबाळांवर प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष परिणाम होत असतो. पुढच्या पिढीला जे द्यायचे त्याचे संचित अशा छोट्या कृतींवरूनच ठरते. लोकशाही हे जर मूल्य आहे आणि केवळ राजकीय व्यवस्थेचे नाही तर जीवनमूल्य आहे, हे नागरिकशास्त्राच्या पाठ्यपुस्तकांतील वाक्य! हे वाक्य प्रत्यक्षात आणणारे पालक कळत-नकळत पुढच्या पिढीवर काही संस्कार करत असतात. मतदान आणि एकूणच लोकशाही मूल्याविषयी पालकांचे, शिक्षकांचे विचार काय आहेत, यावरून नवीन पिढीचा दृष्टिकोन घडतो. तो घडवायचा की बिघडवायचा, हा निर्णय ज्याने त्याने घ्यायला हवा. पुढच्या पिढीला द्यावयाचे संचित बळकट करण्यासाठी मतदानाबद्दलचा आणि लोकशाही प्रक्रियेबद्दलचा आदरभाव संक्रमित करणे प्रत्येकच पिढीसाठी महत्त्वाचे आहे. ही बाब थोडीशी पर्यावरणसंरक्षणाच्या विषयाशी साधर्म्य दाखवते. पुढच्या पिढीसाठी स्वच्छ आणि चांगले पर्यावरण संचित म्हणून ठेवणार की दूषित आणि संकुचित वृत्तीने केलेला पर्यावरणाचा -हास? तसेच हे आहे.

भारत निवडणूक आयोगाने अभ्यासाअंती निश्चित केलेले मतदान औदासीन्य आढळलेले घटक आणि क्षेत्रे यामध्ये महाराष्ट्र राज्यात मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने काळजीपूर्वक नियोजन करून उपक्रम आखले आहेत. त्या त्या जिल्ह्यातल्या जिल्हा निवडणूक अधिका-यांच्या नेतृत्वाखाली कल्पक उपक्रम राबवले जात आहेत. त्यासाठी अतिशय सर्जनशील असे प्रचारसाहित्य मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने उपलब्ध करून दिले आहे. त्या साहित्याचा वापर करून पोस्टर्स, बॅनर्स, होर्डिंग्ज यासारखी माध्यमे वापरता येतील. त्याचबरोबर घरोघरी भेट देऊन मतदान करण्यातील अडचणी समजून घेणे, पथनाट्ये सादर करणे, अडचण असलेल्या मतदारांची मतदान केंद्रापर्यंत आणि परत अशी वाहतूक करण्याची शासनातर्फे व्यवस्था करणे अशा अनेक गोष्टींचा समावेश आहे. स्वयंसेवी संस्थांनी, जबाबदार नागरिकांनी, विद्यार्थ्यांनी मतदानाचा अधिकार बजावण्यास परिसरातील प्रत्येक मतदारास प्रवृत्त करावे. मतदान करणे ही लोकांची इच्छा होण्यास त्यामुळे मदतच होईल.

**-किरण कुलकर्णी**
**लेखक अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य.**

# विधानसभेच्या ६७ वर्षाच्या वाटचालीत आतापर्यंत एकूण ४६१ महिला आमदार

**विधानसभा निवडणुकीसाठी दि.२० नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. संपूर्ण महाराष्ट्रात या विधानसभेसाठी एकाच टप्प्यात मतदान प्रक्रिया पार पाडणार एकूण ४ हजार १३६ उमेदवार या निवडणुकीत लढत आहेत. ज्यामध्ये ३७७१ पुरूष उमेदवार तर ३६३ महिला उमेदवार सहभागी आहेत. किती तरी आमदारांची निवडणूक लढवण्याची ही पहिलीच वेळ असणार आहे. तर काही उमेदवारांची ही दुसरी तिसरी, चौथी, वेळ असणार आहे. सन १९५७ ते १९६२ या कालावधीत पहिली विधानसभा स्थापन झाल्यापासून ते आताच्या चौदाव्या विधानसभे पर्यंत म्हणजे गेल्या ६७ वर्षांत महाराष्ट्राच्या विधानसभेच्या सभागृहात सहभाग घेण्याची संधी आतापर्यंत एकूण ४६१ महिला आमदारांना मिळालेली आहे. भारतात सर्व नागरिकांसोबतच मतदार म्हणून महिला मतदारांना ही मतदान करण्याचा अधिकार प्राप्त झालेला आहे. मात्र आपल्याला विनासायस मिळालेल्या मतदानाच्या या अधिकारासाठी जगातील किती तरी देशांतील महिलांना प्रदिर्घ लढा द्यावा लागलेला आहे. ब्रिटन, अमेरीका, व इतर अनेक देशांत महिला मतदारांना आपल्या मतदानाच्या अधिकारासाठी शंभर, दिडेश वर्ष लढा देऊन मग तो अधिकार प्राप्त झालेला आहे.**

**महिला मतदारांची संख्या**

सन २०११ च्या जनगणनेनुसार १००० पुरुषांमागे ९२९ महिला (Gender Ratio) असे प्रमाण आहे. त्या तुलनेत सन २०१९ साली मतदार यादीतील महिलांचे प्रमाणे ९२५ इतकेहोते. हे प्रमाण वाढवण्याकरिता महिला मतदार नोंदणीसाठी विशेष मोहिमा राबविण्यात आल्या व त्यामुळे २०२४ मध्ये या प्रमाणात ९३६ अशी लक्षणीय सुधारणा झाली आहे.

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक - २०२४ साठी राज्यात ९ कोटी ७० लाख २५ हजार ११९ मतदारांची नोंदणी झाली आहे. त्यामध्ये पुरूष मतदार ५ कोटी २२ हजार ७३९, महिला मतदार ४ कोटी ६९ लाख ९६ हजार २७९ इतकी झाली आहे. म्हणजे एकूण मतदारांच्या संख्येच्या प्रमाणात महिला मतदारांचा टक्का हा जवळपास पन्नास टक्के इतका आहे. राज्यात विविध जिल्हयात महिला मतदारांची संख्या ही पुरुष मतदारां इतकी काही ठिकाणी त्या पेक्षा जास्त असल्याचे पाहायला मिळत आहे.

**आतापर्यंतच्या महिला आमदारांचे संख्याबळ**

समाजाची अर्धी लोकसंख्या असलेल्या महिला वर्गाचे प्रश्न मांडण्यासाठी त्यांच्याच समूहातील म्हणजे महिला आमदार निवडून जाण्याचे प्रमाण हे विधानसभेच्या स्थापनेपासून बदलत असल्याचे बघायला मिळते. २० नोव्हेंबर रोजी मतदान होत होऊन अस्तित्वात येणारी ही विधानसभेची पंधरावी विधानसभा असणार आहे. त्यापूर्वीची म्हणजेच दि.२७ नोव्हेंबर रोजी कार्यकाळ संपणा-या चौदाव्या विधानसभेत एकूण आमदार महिलांची संख्या २७ इतकी होती. महाराष्ट्राची पहिली विधानसभा सन १९५७ ते १९६२ या कालावधीत अस्तित्वात आली. या महाराष्ट्राच्या पहिल्यावहिल्या विधानसभेच्या सभागृहात संधी मिळालेल्या एकूण महिला आमदारांची उपस्थिती लक्षणीय अशी म्हणजे तीस इतकी होती. तर त्याच्या पुढच्या कार्यकाळातील म्हणजे सन १९६२ ते ६७ या कालावधीतील दुस-या विधानसभेत १७ महिला आमदारांना




सभागृहात पोहचण्याची संधी मिळाली होती. आणि १९६७ ते १९७२ या तिस-या विधानसभेत १२ महिला आमदार निवडून आलेल्या होत्या. चौथ्या १९७२ -७८ या कार्यकाळातील विधानसभेत २८ महिला आमदारांनी सभागृहात हजेरी लावली तर १९७८-८० या कालावधीत कार्यरत पाचव्या विधानसभेत ८ महिला आमदार होत्या. १९८०-८५ या काळातील सहाव्या विधानसभेत २० तर त्याच्या नंतर अस्तित्वात आलेल्या १९८५-१९९० या कालावधीतील सातव्या विधानसभेत १६ आणि सन १९९०-९५ मध्ये कार्यरत आठव्या विधानसभेत ६ महिला आमदार होत्या. तर नवव्या विधानसभेत म्हणजेच १९९५-९९ या काळात १४ महिला आमदार निवडून आल्या. सन १९९९ - २००४ या काळात अस्तित्वात आलेल्या दहाव्या विधानसभेत १३ महिला आमदार तर अकराव्या विधानसभेत २००४- २००९ या कालावधीत बारा महिला मतदार विधानसभेच्या सभागृहात होत्या. २००९-२०१४ या कार्यकाळात अस्तित्वात आलेल्या बाराव्या विधानसभेत १३ महिला आमदार, तर सन २०१४- २०१९ मधील तेराव्या लोकसभेत २२ आणि सन २०१९- २०२४ या चौदाव्या विधानसभेत २७ महिला आमदारांनी जनतेच्या प्रश्नांची मांडणी केली. या सर्व महिला आमदारांमध्ये पहिल्या विधानसभेतील एकूण महिला आमदारांमध्ये पाच महिला आमदार या अपक्ष होत्या. तर त्यानंतरच्या कुठल्याच विधानसभेत अपक्ष महिला आमदार नव्हत्या. त्यानंतरच्या १४ व्या विधानसभेत २ अपक्ष महिला आमदार राहिल्या. एकंदरीत विधानसभेत राजकीय पक्षाच्याच महिला आमदार प्रतिनिधी यांचे प्रमाण सातत्याने पाहायला मिळत आहे.

**पहिल्या विधानसभेत आतापर्यंतच्या सर्वाधिक महिला आमदार**

आतापर्यंत स्थापन झालेल्या विधानसभेच्या कार्यकाळात पहिल्या विधानसभेत तीस इतक्या भरघोस संख्येने महिला आमदार सभागृहात होत्या. त्यानंतरच्या कुठल्याच विधानसभेत इतक्या मोठ्या संख्येने महिला आमदार राहीलेल्या नाहीत. त्याच्या खालोखाल १९७२-७८ या कार्यकाळातील चौथ्या विधानसभेत २८ तर आणि सन २०१९- २०२४ मध्ये चौदाव्या विधानसभेत २७ इतक्या महिला आमदारांची संख्या बघायला मिळाली. आतापर्यंतच्या चौदा विधानसभांच्या कार्यकाळात सर्वात कमी महिला आमदार या सन १९९०-९५ मध्ये कार्यरत आठव्या विधानसभेत ६ तर १९७८-८० या कालावधीत कार्यरत पाचव्या विधानसभेत केवळ ८ महिला आमदार होत्या. म्हणजेच पहिल्या विधानसभेच्या १९५७ ते १९६२ या साली महिला आमदारांची संख्या ही सर्वात जास्त राहिलेली आहे. महिला आमदारांचे प्रमाण वाढत असल्याचे आाासक चित्र पुढच्या विधानसभेच्या कार्यकाळात बघायला मिळत नाहीये तर सातत्याने हे प्रमाण तीसच्या आत राहिलेले असून त्यात चढउतार झालेले दिसते.

**महिला मतदारांचा मतदानातील सहभाग**

सन २०१४ विधानसभा निवडणुकीतील महिला मतदान टक्केवारी ६१.६९ एवढी होती. २०१९मध्ये महिला मतदारांची संख्या ४,२७,०५,७७७ एवढी होती. सन २०१९ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत एकूण मतदान टक्केवारी ६१.१ होती, तर महिला मतदानाची टक्केवारी ५९.२६ आणि पुरुष मतदानाची टक्केवारी ६२.७७ टक्के एवढी राहीली. म्हणजे महिला मतदानाच्या टक्केवारी पेक्षा साडे तीन टक्के पुरुष मतदान जास्त होते. मात्र विधानसभेत महिला आमदारांचा टक्का हा पुरुष आमदारांच्या तुलनेत अत्यंत कमी राहीलेला आहे.

या वर्षी किती महिला आमदारांना आपला आवाज सभागृहात मांडण्याची संधी मिळणार आहे हे येत्या २३ नोव्हेंबरला म्हणजे या निवडणूकीच्या मतदानानंतर आपल्याला समजेलच, महिला आमदारांच्या निवडून येण्याचे प्रमाण वाढवण्यात महिला मतदारांचे शंभरटक्के मतदान करण्याचे प्रमाण निश्चितच परिणामकारक ठरेल.

**(संदर्भ- विधीमंडळ ग्रंथालयाच्या सौजन्याने)**
**- वंदना रघुनाथराव थोरात, विभागीय संपर्क अधिकारी,**

# ॲडमीन साहेब! तुमचा ग्रुप ओन्ली ॲडमीन करा!

## सोशल मिडीयाचा निवडणूकीच्या काळात जबाबदारीने वापर करावा

**नांदेड, दि. १२ नोव्हेंबर : लोकसभा पोटनिवडणूक व विधानसभा निवडणूक शेवटच्या टप्प्यात असून या काळात कोणत्याही परिस्थितीत आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही तसेच माध्यम प्रमाणीकरण व सनियंत्रण समितीच्या निर्देशाचा भंग होणार नाही यासाठी विविध व्हाट्सअप ग्रुपचे डमिन व सर्व ग्रुप ओन्ली एडमिन करावे, असे आवाहन पोलिस प्रशासनाने केले आहे.**

समाज माध्यमांवर व्यक्त होताना अतिशय जबाबदारीने व्यक्त होण्याचा हा काळ आहे. मात्र




अनेकजण या काळात प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे प्रचार प्रचाराचा भाग होऊन जातात. जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात सोशल मीडिया मॉनिटरिंग सुरू आहे . त्यामुळे याबाबत डमिनने अधिक दक्ष असण्याचे जिल्हा पोलीस प्रशासनाने काढलेल्या पत्रकात स्पष्ट केले आहे.

लोकसभा पोटनिवडणुक २०२४ व विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने १५ ऑक्टोबर ते २५ नोव्हेंबर २०२४ पर्यत आदर्श आचारसंहिता अंमलात आली आहे. नांदेड जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रात सार्वत्रिक निवडणुकीचे मतदान २० नोव्हेंबर २०२४ रोजी व निकाल २३ नोव्हेंबर २०२४ रोजी जाहीर होणार आहे. या कालावधीत व्हॉटसप ग्रुपचे डमीन यांनी ग्रुपच्या सेंटीगमध्ये ओन्ली डमीन बदल करून घ्यावा, जेणेकरून ग्रुपमधील कोणताही सदस्य वादग्रस्त पोट करणार नाहीत असे आवाहन जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी केले आहे.

तरी नागरिकांनी सोशल मिडीयाद्वारे फेसबुक, इस्टाग्राम, व्हॉटसअप ग्रुप व इतर तत्सम एप्लीकेशनच्या माध्यमाद्वारे कोणत्याही व्यक्तीच्या, वंशाच्या, समाजाच्या, जातीच्या, धर्माच्या व वर्णाच्या भावना दुखावतील अशा स्वरूपाच्या पोस्ट, कॉमेटस, स्टोरी स्टेटस, डिजीटल बॅनर असे प्रकार वरील माध्यमाद्वारे करु नयेत. तसेच कोणाचेही विरोधात घोषणाबाजी करु नये, डिजे वाजवणार नाहीत, फटाके फोडणार नाही, रंग गुलाल उधळणार नाही. संबंधीत विभागाच्या पूर्व परवानगीशिवाय कोणतेही राजकीय कार्यक्रम करु नयेत. व्हॉटसप ग्रुपचे डमीन यांनी १५ ऑक्टोबर ते २५ नोव्हेंबर २०२४ या कालावधीत त्यांच्या ग्रुपच्या सेटींगमध्ये ओन्ली डमीन करून बदल करून घ्यावा. जेणेकरून ग्रुपमधील कोणताही सदस्य वादग्रस्त पोस्ट् ग्रुपवर टाकणार नाहीत. जर डमीन यांनी सेंटीगमध्ये बदल केला नाही व कोणी सदस्यांनी वादग्रस्त पोस्ट टाकल्याने काही कायदा व सव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास पोस्ट करणाऱ्या सदस्याला व डमीनला जबाबदार धरून योग्य ती कायदेशिर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी,असे आवाहन नांदेड जिल्हा पोलीस विभागातर्फे केले आहे.

**NAME IN CHANGE**
My old name is "Syed Zaid Anzar Mohammad" Which now I am changing as new name "Sayyad Anzar Sayyad Nazar Mohammad"
Hence forth my all correspondence will be done as per new name.
Please consider the same.
Address : Mominpura Kinwat Tq. Kinwat Dist Nanded.(MH) 431804

**Format C-1**
*( for candidate to publish in Newspapers, TV )*

**Declaration about criminal cases**

*( As per the judgment dated 25th September, 2018, of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No.536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)*

Name and address of candidate: **SHRI BHIMRAO RAMJI KERAM**
**AT.POST. RAJGRUHA NIWAS, RAJENDRA NAGAR,**
**KINWAT DIST. NANDED**

Name of political party: **BHARATIYA JANTA PARTY**
*(Independent candidates should write "Independent" here)*

Name of Election: **GENRAL ELECTION TO MAHARASHTRA LEGISLATIVE ASSEMBLY 2024**

*Name of Constituency: **083 KINWAT ASSEMBLY CONSTITUENCY**

I **BHIMRAO RAMJI KERAM** (name of candidate), a candidate for the above mentioned election, declare for public information the following details about my criminal antecedents:

| Sl. No. | Pending criminal cases | | | Details about cases of conviction for criminal offences | |
|---|---|---|---|---|---|
| | Name of court | Case No. and status of case | Section (s) of acts concerned and brief description of offence (s) | Name of court & Date(s) of order(s) | Description of Offence (s) & punishment imposed |
| 1 | 2nd Jt. Civil Judge Jr. Dn and J.M.F.C. YAVATMAL | S.C.C.No. 4456/2017 FOR APPEARANCE | VIOLATION OF CODE OF, CONDCT U/S 341,143,188 IPC 135 THE B.P. ACT | NOT APPLICABLE | NOT APPLICABLE |
| 2 | CIVIL JUDGE J.D. AND J.M.F.C. KINWAT | S.C.C.No. 107/2011 03/07/2011 CASE DISPOSED 03/07/2015 | VIOLATION OF CODE OF, CONDCT U/S 135 (III) THE B.P. ACT 1951 | JUDICIAL MAGISTRATE F.C. KINWAT 03/07/2015 | FINE OF Rs. 500/- |

**प्रपत्र सी-१**

## फौजदारी प्रकरणांबाबतचे घोषणापत्र

उमेदवाराचे नांव व पत्ता **: श्री भीमराव रामजी केराम**
**मु.पो.राजगृह निवास, राजेंद्र नगर,**
**किनवट ता.किनवट जि.नांदेड**

राजकीय पक्षाचे नांव **: भारतीय जनता पार्टी**

निवडणूकीचे नांव **: विधानसभा सार्वत्रिक निवडणुक २०२४**

मतदारसंघाचे नांव **: ०८३ किनवट विधानसभा**

मी भीमराव रामजी केराम वर नमूद केलेल्या निवडणूकीचा उमेदवार असून माझ्या फौजदारीपूर्व चारित्र्याबद्दलचा पुढील तपशिल जनतेच्या माहितीसाठी घोषीत करीत आहे.

| | प्रलंबित फौजदारी प्रकरणे | | | फौजदारी अपराधासाठी दोषसिध्द ठरविलेल्या प्रकरणांचा तपशिल | |
|---|---|---|---|---|---|
| | न्यायालयाचे नांव | प्रकरण क्रमांक व प्रकरणाची स्थिती | प्रकरणाची सद्यस्थिती संबंधीत अधिनियमांचे कलम (अधिनियमांची कलमे) आणि अपराधाचे (अपराधांचे) थोडक्यात वर्णन | न्यायलयाचे नांव व आदेशांचे दिनांक | अपराधाचे वर्णन व ठोठावलेली शिक्षा |
| १) | दुसरे सहदिवाणी न्यायाधिश क. स्तर न्यायालय आणि प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, यवतमाळ | एस.सी.सी. क्र.४४५६/२०१७ हजेरीसाठी | कलम ३४१, १४३, १८८ भादंवि आणि कलम १३५ बॉम्बे पोलीस कायद्यानुसार | लागू नाही | लागू नाही |
| २) | दिवाणी न्यायाधिश क. स्तर न्यायालय आणि प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, किनवट | एस.सी.सी.क्र.१०७/२०११ दि.०३/०७/२०११ आणि प्रकरण निकाली निघाल्याची तारीख दि.०३/०७/२०१५ | कलम १३५ (III) बॉम्बे पोलीस कायदा १९५१ नुसार | प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी न्यायालय, किनवट निकाल दि.०३/०७/२०१५ | ५००/- रु.दंड |




**आपला मतदार यादी भाग क्रमांक व अनुक्रमांक जाणून घेण्यासाठी एसएमएस सुविधा**




१९५० ह्या क्रमांकावर ECI <space> (तुमचा मतदार ओळख पत्र क्र.) असा मेसेज पाठवा.
उदाहरणार्थ : ECIXYZ1234567 - 1950 वर पाठवा
15 सेकंदात तुम्हाला एसएमएसच्या माध्यमातून तुमच्या मतदार यादीतील नावासह इतर तपशील मिळेल.

-जिल्हा निवडणूक अधिकारी नांदेड.

## मतदार जनजागृतीसाठी मतदारांशी विविध माध्यमातून संवाद

# निवडणूक यंत्रणामार्फत राज्यभरात जनजागृतीवर भर



**लोकादेश न्यूज, किनवट : राज्यात विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी प्रशासन सज्ज झाले आहे. २० नोव्हेंबर २०२४ रोजी राज्यात जास्तीत जास्त मतदारांनी मतदान करावे यासाठी निवडणूक यंत्रणा सर्वांना आवाहन करत आहे. विधानसभा निवडणुकीत राज्याचं मतदानाचं प्रमाण वाढावं असं उद्दिष्ट राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं समोर ठेवलंय आणि त्यासाठी राज्यभर मतदार जनजागृती उपक्रम राबवले जात आहेत.**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ नुकतीच पार पडली. या निवडणुकांत राज्याची मतदानाची टक्केवारी ६६.०५ टक्के होती. यावेळी नंदूरबार जिल्ह्यात ७२.९४ टक्के, कोल्हापूर मध्ये ७१.७८ टक्के गडचिरोली मध्ये ७०.५५ टक्के मतदान झाले तर मुंबई शहर राज्यात सर्वात कमी मतदान झालेला जिल्हा असून या जिल्ह्यात ५१ टक्के इतके कमी मतदान झाले होते. राज्यातील मुंबई शहर जिल्ह्यातील कुलाबा मतदारसंघ, मुंबई उपनगर जिल्ह्यातील कलिना मतदारसंघ, ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ, पुणे येथील पुणे छावणी (कंटोनमेंट) येथे सर्वात कमी मतदान झाले होते. मतदान कमी असलेल्या जिल्ह्यात मतदान वाढविण्यासाठी प्रशासन विविध जनजागृतीवर भर देत आहे.

**स्वीप उपक्रमामुळे मतदानात वाढ**

'स्वीप' या उपक्रमामुळे तृतीय पंथीय मतदारांची २०१९ मध्ये २५९३ इतक्या संख्येवरून ते ३० ऑगस्ट २०२४ पर्यंत ५९४४ इतकी नोंद झाली आहे. त्याचबरोबर युवा मतदारांची निवडणूक प्रक्रियेत अधिक सक्रिय होण्यासाठी निवडणूक प्रशासन अनेक उपक्रम राबवित आहे त्यामुळे युवा मतदारांचीही मोठ्या संख्येतही वाढ होत आहे. अमरावती जिल्ह्यात विविध स्वीपच्या उपक्रमांमुळे २०१९ च्या विधानसभा निवडणुकात ६०.३६ टक्के, सन २०२४ च्या लोकसभा निवडणुकांत ६३.५८ टक्के इतके मतदान झाले. नाशिक जिल्ह्यात देखील मतदान जनजागृतीमुळे ६१.७४ टक्केवरून गेल्या लोकसभेत ६४.२१ टक्के इतके मतदान झाले आहे.

मल्टिमिडीयाचा वापर

स्वीप कार्यक्रमांतर्गत मतदारांशी विविध माध्यमांतून संवाद साधला जात आहे. यात मल्टिमीडियाचा प्रभावी वापर आणि थेट जनसंपर्क अशा दोन्ही पद्धतींचा समावेश आहे. मतदारांना प्रोत्साहित करण्यासाठी अठरावं वरीस मोक्याचं, इथे सगळी बोटे सारखी आहेत, मधाच्या बोटाला बळी पडू नका, निर्धार महाराष्ट्राचा विधानसभा निवडणुकीत मतदानाचा, अशा आकर्षक संदेशांचा वापर केला जातोय. हे संदेश शासकीय आणि नागरी सेवांच्या सहकार्यानं राज्यभर पोहोचवले जात आहेत. राज्यातली माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाची ८०० होर्डिंग, वाहतूक कार्यालयाच्या राज्यभरातील शाखांमधील होर्डिंग, राज्यभरातील महानगरपालिकांचे ३ हजारांपेक्षा जास्त डिजीटल डिस्प्ले, सार्वजनिक बस सेवा पुरवणा-या १००० पेक्षा जास्त बस आणि १५०० पेक्षा जास्त इतर वाहने, ११०० पेक्षा जास्त बस स्थानकं, सुमारे ५ हजार स्वच्छता वाहनांवरून होत असलेल्या घोषणा, मध्य आणि प चिम रेल्वे तसंच मेट्रो रेल्वे सेवेद्वारा रेल्वेगाड्यांमधल्या घोषणा - फलाटांवरील जाहिरातींचे डिस्प्ले इतकी याची व्याप्ती मोठी आहे. इतकंच नाही तर महानगर - टाटा पॉवर - बेस्ट वीज सेवा यांच्याद्वारे २० लाखांपेक्षा जास्त देयकांवर तसंच राज्य भरातील महानगर पालिकांनी पाठवलेल्या ८ लाख मालमत्ता करांच्या देयकांवर प्रसिद्ध केलेल्या जाहिरात स्वरुप संदेशांमधून, राज्यभरातील लाखो कुटुंब म्हणजे कोट्यवधी मतदारांपर्यंत मतदान करण्याचं आवाहन थेट पोहचत आहे.

**राज्यस्तरीय मतदान जनजागृती कार्यक्रम**

मुंबईत गेट वे ऑफ इंडिया इथं भारत निवडणूक आयोगाच्या 'स्वीप' कार्यक्रमाअंतर्गत राज्यस्तरीय मतदारजागृती उपक्रमांचा प्रारंभही झाला. मुंबई पोलीस दलाच्या वाद्यवृंद पथकाचं सादरीकरण, निवडणूक गीताचं सादरीकरण - त्यावरचं नृत्य, टपाल विभागाकडून विशेष पाकीट - शिक्क्याचं अनावरण, मतदारांना प्रतिज्ञा, असे उपक्रम राबवले. महत्वाचं म्हणजे या कार्यक्रमात मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाच्या सदिच्छादूत श्रीगौरी सावंत आणि दिव्यांग मतदार सदिच्छादूत निलेश सिंगीत, राज्याच्या निवडणूक गीताचे संगितकार गायक मिलिंद इंगळे, गायक राहुल सक्सेना, रॅपर सुबोध जाधव, क्रिकेटपटू अजिंक्य रहाणे, अभिनेत्री वर्षा उसगांवकर, दिग्दर्शक रोहित शेट्टी, अभिनेत्री अनन्या पांडे, हास्य कलाकार भारती सिंग, हर्ष लिंबाचिया, अभिनेते मनोज जोशी, अभिनेता बजाज आनंद, अभिनेत्री सोनाली खरे, अभिनेता अली असगर यांच्यासह सामाजिक आणि कला क्षेत्रातल्या अनेक नामांकित व्यक्तिमत्वांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून मतदारांना आपला मताधिकार बजावण्याचं आवाहन केलं. या कार्यक्रमातच, केंद्रीय संचार ब्यूरोच्या प्रादेशिक कार्यालयाच्या फिरत्या मतदार जनजागृती वाहनालाही हिरवा झेंडा दाखवला गेला. हे फिरत वाहन राज्यातील मतदानाचं अल्प प्रमाण असलेल्या १५ जिल्हे आणि १३३ मतदारसंघांमध्ये जनजागृती करत आहे. या फिरत्या वाहनाच्या माध्यमातून मतदान प्रक्रिया, मतदान केंद्राचं ठिकाण समजून घेणं, आदर्श आचारसंहिता, आचारसंहिता उल्लंघनाच्या तक्रारी, उमेदवारांविषयी जाणून घेणं याविषयी मतदार जागृती केली जातेय.

**जिल्हास्तरीय निवडणूक यंत्रणाकडूनही मतदार जनजागृतीसाठी उपक्रम**

राज्यात प्रत्येक जिल्ह्याची निवडणूक यंत्रणाही स्वीप कार्यक्रमाअंतर्गत स्वतंत्रपणे मतदार जनजागृतीचे उपक्रम राबवते आहे. घरोघरी भेटी, रांगोळया, मानवी साखळया, प्रभात फेऱ्या, पथनाट्य, सायकल - बाईक रॅली, मॅरेथॉन, मतदारांना शपथ, संकल्पपत्र, विविध स्पर्धा, सण साजरे करण्याच्या निमित्तानं मतदारजागृतीपर उपक्रम सुरु आहेत. बुलडाणा जिल्ह्यात मतदारांना मतदान प्रक्रियेची ओळख करून देण्यासाठी जिल्हा परिषद शाळांमार्फत अभिरुप मतदान केंद्रांची तालीम आयोजित करण्यात आली. यामुळे लोकांना प्रत्यक्ष मतदानाच्या प्रक्रियेचा अनुभव मिळाला.

लातूर जिल्ह्यात मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी अभंग, गवळणी, भारुड, गोंधळगीत, पोवाडा अशा पारंपरिक कलाप्रकारांचा अभिनव वापर केला जातोय. तिथे १२१ शाळांच्या विद्यार्थ्यांमार्फत १ लाख ३ हजारापेक्षा जास्त पालकांपर्यंत पोहचत मतदानाचं संकल्पपत्र भरून घेण्यात आलंय. सांगलीत शासकीय रुग्णालयांच्या ओपीडी दस्तऐवजांवर, बँकांच्या व्यवहार पावत्यांवर मदानाच्या तारखेचं स्मरण करून देणारा शिक्का वापरून मतदार जनजागृती केली जातेय. जळगाव जिल्ह्यात, एकाच वेळी तब्बल १३३३ ग्रामपंचायतींमध्ये मतदार जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. सव्वा लाखापेक्षा अधिक मतदारांनी मतदानाची प्रतिज्ञा घेतली तर दोन लाखांपेक्षा अधिक मतदारांनी संकल्पपत्र भरले.

**एक जिल्हा - एक व्हाट्सअप नंबर**

अहिल्यानगर जिल्ह्यात मतदारांपर्यंत पोहचण्यासाठी एक जिल्हा - एक व्हाट्सअप नंबर हा अभिनव उपक्रम राबवला जातोय. या उपक्रमासोबतच, जिल्ह्यातील मतदारांसाठी ई-शपथविधीचा उपक्रमही सुरू करण्यात आला आहे, ज्यामध्ये मतदारांना शपथ घेतल्यानंतर क्यू आर कोडच्या माध्यमातून ई-प्रमाणपत्रही दिलं जातंय. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात फुलंब्री मध्ये आमची स्वीपची टीम थेट शेतमजुरांपर्यंत पोहचली, सर्व शेतमजुरांनी काम तर बारा महिने चालतं, पण मतदानाच्या दिवशी आम्ही नक्की मतदान करणार असा संकल्प व्यक्त केला आहे. या अशा प्रयत्नांसोबतच मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय आणि सर्व जिल्ह्यांच्या समाजमाध्यम खात्यांवरूनही मतदार जागृती केली जाते, मतदार जागृतीच्या उपक्रमांना प्रसिद्धी दिली जातेय. समाजमाध्यमांवरून सेलिब्रिटी, समाजातील प्रभावी व्यक्तिमत्वांची आवाहनं प्रसिद्ध केली जात आहेत.

**सर्व सोयीसुविधायुक्त मतदान केंद्र**

मतदान प्रक्रियेला मतदारांना आकर्षित करणारी असावी यासाठीही राज्यात अनेक ठिकाणी विशेष संकल्पना घेऊन मतदान केंद्र उभारली जात आहेत. यात वन्यजैवविविधता, सांस्कृतिक - सामाजिक वारशाचं दर्शन, स्तनदा - गर्भवती महिलांसाठी हिरकणी मतदान केंद्र, युवा - दिव्यांग - महिला संचलित विशेष मतदान केंद्र उभारली जात आहेत. दिव्यांग मतदारांसाठी रॅम्प, व्हीलचेअर, सहकार्यासाठी स्वयंसेवकांची व्यवस्था, मतदारांसाठी शेड - पिण्याचं पाणी, स्वच्छतागृहांची सोय उपलब्ध असतील हे पाहिलं जातंय. अभिनव पद्धतीनं मतदारांचं स्वागत करून त्यांचा मतदानाचा अनुभव संस्मरणीय करण्याचा प्रयत्न सर्व ठिकाणी केला जातोय.

अशा या विविधांगी प्रयत्नांच्या माध्यमातून ९ कोटी ७० लाखापेक्षा जास्त मतदारांपर्यंत ज्यात, २ कोटी पेक्षा जास्त युवा म्हणजे १८ ते २९ वयोगटातलेही मतदार आहेत आणि वयाची शंभर पूर्ण केलेले ४७ हजारापेक्षा जास्त मतदार आहेत त्या सर्वांपर्यंत पोहचून सजग, जाणकार, आणि शिक्षित मतदार घडवण्याचा आणि मतदानाची टक्केवारी वाढवण्याचा निवडणूक यंत्रणेचा प्रयत्न आहे. त्यामुळे निवडणूक यंत्रणा मतदानाच्या दिवसासाठी सज्ज झाली असून आता प्रत्येक मतदाराची जबाबदारी आहे आपला मतदानाचा हक्क बजावण्याची.

**संध्या गरवारे, विभागीय संपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय.**

# जिल्ह्यातील सर्व न्यायालयात १४ डिसेंबर रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन

**नांदेड, दि. १३ नोव्हेंबर :- राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण नवी दिल्ली यांच्या आदेशान्वये महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण मुंबई व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण नांदेड यांच्यावतीने १४ डिसेंबर २०२४ रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हा न्यायालयात व जिल्ह्यातील सर्व तालुका न्यायालयात तसेच कौटुंबिक न्यायालय नांदेड येथे ही राष्ट्रीय लोकअदालत संपन्न होईल. सर्व संबंधित पक्षकारांनी या राष्ट्रीय लोकअदालतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रमुख जिल्हा न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्ष सुरेखा कोसमकर व जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव तथा न्यायाधीश दलजीत कौर जज यांनी केले आहे.**

या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये प्रलंबित तडजोडपात्र फौजदारी प्रकरणे, दिवाणी प्रकरणे, मोटार अपघात नुकसान भरपाईचे प्रकरणे, दिवाणी प्रकरणे, मोटार अपघात नुकसान भरपाई प्रकरणे, भूसंपादन प्रकरणे, धनादेश अनादरीत झाल्याबाबतची प्रकरणे तसेच कौटुंबिक न्यायालयातील तडजोड होण्यायोग्य प्रकरणे, ग्राहक तक्रार निवारण मंच, सहकार न्यायालय व कामगार न्यायालयातील प्रकरणे इत्यादी प्रकरणे तडजोडीसाठी ठेवण्यात येणार आहेत. याशिवाय या लोकअदालतीत दाखलपूर्व प्रकरणे जसे थकीत मालमत्ता कर, थकीत विद्युत बिल, थकीत टेलीफोन बिल, विविध बॅकांचे कर्ज वसुलीचे प्रकरण, थकीत पाणी बिल इत्यादी प्रकरणे तडजोडीद्वारे निकाली काढल्या जातील.




राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये झालेल्या निवाडयाविरूद्ध अपील नाही. प्रलंबीत प्रकरणात भरलेली कोर्ट शुल्काची रक्कम शंभर टक्के परत मिळते. नातेसंबंधात कटुता निर्माण होत नाही अशा प्रकारे लोकन्यायालयाच्या माध्यमातून सुलभ, जलद व मोफत न्याय मिळतो. पक्षकारांनी येतांना आपले अधिकृत ओळखपत्र घेवून यावे. या लोकअदालतीत मोठ्या संख्येने प्रकरणात तडजोड होण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# स्वतःला लोकशाहीचे पाईक समजून संवेदनशीलतेने मतदान व मतमोजणी कार्य पूर्ण करा-दिपक मिश्रा

## विशेष पोलीस निवडणूक निरीक्षकांकडून जिल्ह्याचा आढावा

### नागरिकांनी निर्भय होवून मोठया संख्येने मतदानाला यावे



**नांदेड दि. १७ नोव्हेंबर : लोकशाही असल्यामुळे आपले अस्तित्व आहे. लोकशाहीसाठी आवश्यक असणा-या निवडणूका निर्भय व पारदर्शी वातावरणात झाल्या पाहिजे. प्रत्येक नोकरदाराने लोकशाही आहे म्हणून आपले अस्तित्व आहे, हे जाणून लोकशाहीचे ऋण चुकविण्यासाठी संवेदनशिलतेने काम करावे, असे आवाहन विशेष पोलीस निवडणूक निरीक्षक दीपक मिश्रा यांनी केले.**

विशेष पोलीस निवडणूक निरीक्षकानी आज सकाळी नांदेड व लातूर जिल्ह्याचा आढावा घेतला. या बैठकीला विशेष पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, जिल्हा पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार, लातूरचे जिल्हा पोलीस अधिक्षक सोमय मुंडे तथा वरिष्ठ पोलीस अधिकारी यांची ऑनलाईन पध्दतीने उपस्थिती होती.

**पोलीसांचा कॅमेरा आता प्रत्येक ठिकाणी**

पुढच्या ४८ तासात लोकशाहीचे भविष्य निश्चित होणार आहे. पोलीस विभागासाठी हे ४८ तास २४ गुन्हीले ७ लक्ष ठेवण्याचे आहे. तुम्हाला दिलेल्या अधिकाराचा शंभर टक्के वापर करा. शक्य त्या ठिकाणी व्हिडीओ रेकॉर्डिग करा. यामध्ये ईव्हीएम मतदान केंद्रावर पोहोचविण्यासह बुथवरील सुरक्षा व्यवस्थेचेही रेकॉर्डिंग ठेवा. प्रत्येक बुथवरच्या पोलीस कर्मचा-यांने किती मिनीटात रिपोर्टीग करायचे, याबाबतची निश्चित कालमर्यादा पोलींग स्टेशन ते वरिष्ठ पोलीस अधिकारी यांचा प्रतिसाद कालावधी जितका कमी कराल तीतक्या चांगल्या पध्दतीने कामकाज होईल, असेही त्यांनी यंत्रणेला निर्देश दिले.

**मोबाईलला परवानगी नाहीच**

मतदानाच्या दिवशी मोबाईलला परवानगी नाही. त्यामुळे आतमध्ये जाऊन होणा-या रेकॉर्डिग व त्यामुळे दाखल होणारे गुन्हे यासंदर्भात कडेकोट पायबंद घाला. शंभर मीटरच्या आतमध्ये मोबाईल किंवा कोणत्याही कॅमे-यावर कोणतेही शुटींग होणार नाही याची काळजी घ्या. १६३ कलम याठिकाणी लागली आहे. त्यामुळे सक्तीने वापर करा. केंद्रात प्रवेश करणा-या माणसाला विनाविलंब आतमध्ये प्रवेश करता आला पाहिजे अशा पध्दतीने अनुभवी माणसाची नेमणूक त्याठिकाणी करा. माध्यमासाठी असणा्या निवडणूक आयोगाच्या निर्देशाशिवाय कुठलीही हयगय होणार नाही यासाठी काळजी घ्या.

**व्हिलचेअरची संख्या वाढवा**

रांगेत उभा राहून, संयम बाळगून, काही वेळ देवून, मतदान करणारा सामान्य मतदाता हा खरा लोकशाहीचा रक्षक आहे. त्यामुळे पोलीस दलासह सर्वानी त्याची विशेष काळजी घ्यावी. ज्येष्ठ नागरिक व दिव्यांगाना व्हिलचेअरची सुविधा अधिक चांगल्या प्रकारे मिळेल यासाठी काळजी घ्या. गरज भासल्यास खाजगी स्तरावरुन उपलब्ध करा. प्रत्येक गोष्ट कॅमेराच्या नजरेत राहील यादृष्टीने नियोजन करा.

**नागरिकांनो निर्भय होवून मतदानाला या**

यावेळी त्यांनी जिल्ह्यातील कडेकोट बंदोबस्त, ठिकठिकाणी नाकाबंदी, निवडणूक कायद्याचे कडक पालन हे सर्व नागरिकांना अतिशय निर्भय, पारदर्शी व सुलभ पध्दतीने मतदान करता यावे यासाठी आहे. पोलीस प्रशासन, जिल्हा प्रशासन सामान्य मतदारांना कोणताही त्रास होवू नये तसेच मतदान प्रक्रीया सुलभतेने पार पाडावी यासाठी झटत आहे. मोठ्या संख्येने नागरिकांनी मतदानासाठी बाहेर पडावे व लोकशाहीला बळकट करण्यासाठी मतदान प्रक्रीयेत भाग घ्यावा.

# निवडणूक कर्मचा-यासाठी १३३ बसेसची व्यवस्था

## लांब पल्ल्याच्या बसेस आज १८ ला दुपारी २ वाजता निघणार

### जवळच्या कार्यक्षेत्रासाठी १९ नोव्हेंबरला पहाटे ५ ते ७ व्यवस्था



**नांदेड दि. १७ नोव्हेंबर :- नांदेड लोकसभा पोटनिवडणूक व ९ विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदानासाठी नियुक्त अधिकारी व कर्मचा-यांना १८ व १९ नोव्हेंबर २०२४ रोजी मतदारसंघात नेऊन सोडणे व २० नोव्हेंबर २०२४ रोजी निवडणूक मतदान प्रक्रिया पार पाडल्यानंतर परत संबंधीत कर्मचारी यांना त्यांच्या मुळ विधानसभा मतदार संघात आणण्यासाठी ४४ सीटरच्या एकूण १३३ बसेस वाहनाची व्यवस्था करण्यात आली आहे. कर्मचा-यांनी आपल्या नियुक्त्या व वेळा बघून या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा निवडणूक विभागाने केले आहे.**

लांब पल्ल्यासाठी उद्या दिनांक १८ नोव्हेंबर रोजी दुपारी २ ते ४ तर जवळच्या केंद्रासाठी १९ तारखेला सकाळी ५ ते ७ या काळात कर्मचा-यांसाठी बसेस उपलब्ध राहणार आहेत. आपल्या नियक्त क्षेत्राकडे जाण्यासाठी सर्व कर्मचा-यांनी याची नोंद घ्यावी.

**कुठून निघतील बसेस**

८३ -किनवट मतदारसंघातील अधिकारी कर्मचा-यांसाठी शासकीय आयटीआय गोकुंदा, किनवट येथून बसेस निघणार आहेत. हदगाव मतदारसंघासाठी समाज कल्याण विभागाचे मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, बुध्दभूमी वसाहत, तामसा रोड, हदगाव येथून बस निघतील. ८५ भोकर साठी नगरपरिषद नांदेड रोड, भोकर येथून तर ८६ -नांदेड उत्तर व ८७- दक्षिण साठी शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड येथून बसेस निघणार आहेत. लोहासाठी पंचायत समिती, तहसिल कार्यालय परिसर लोहा येथून तर नायगावसाठी शासकीय आयटीआय, नायगाव येथून बसेस निघणार आहेत. ९०- देगलूर साठी तहसिल कार्यालय, देगलूर येथून तर ९१-मुखेडसाठी मुख्य प्रशासकीय इमारत तहसील कार्यालय, मुखेड येथून बसेस निघतील.

**अशी आहे निवास व्यवस्था**

किनवट मतदारसंघासाठी मातोश्री कमलताई ठमके इंग्लिश स्कूल, कोठारी (चि) किनवट येथे निवास व्यवस्था करण्यात आली आहे. तर हदगाव मतदारसंघासाठी मुलींचे वस्तीगृह इमारत क्र.तीसरा मजला, हदगाव येथे तर ८५ भोकर साठी ओम लॉन्स मंगल कार्यालय, बायपास रोड, भोकर येथे निवास व्यवस्था केली आहे. ८६ -नांदेड उत्तर व ८७- दक्षिणसाठी निवास व्यवस्था ए.के.संभाजी मंगल कार्यालय, नांदेड येथे केली आहे. लोहा साठी निवास व्यवस्था श्रीनिवास मंगल कार्यालय साई गोल्डन, सिटी मेन रोड, लोहा येथे केली आहे. - नायगावसाठी सामाजिक न्याय भवन, निवासी वसतीगृह नायगाव येथे निवास व्यवस्था येथे केली आहे.

९०- देगलूर मतदार संघासाठी निवास व्यवस्था नगरेश्वर मंदीर व मंगल कार्यालय, देगलूर येथे केली आहे. ९१-मुखेड मतदार संघासाठी कै. गोविंदराव राठोड बहुउद्देशिय सभागृह तालुका क्रीडा संकुल, बीएसएनएल टॉवरजवळ शांतीनगर, मुखेड येथे निवास व्यवस्था केली आहे.

तरी मतदान अधिकारी, कर्मचा-यांनी लांब पल्ल्यासाठीच्या मतदारसंघात जाण्यासाठी १८ नोव्हेंबर रोजी दुपारी २ ते ४ यावेळेत आणि जवळच्या अंतरासाठी १९ नोव्हेंबर रोजी सकाळी ५ ते ६ वाजता बसेस उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. तरी मतदानासाठी नियुक्त अधिकारी कर्मचारी यांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन वाहतुक व्यवस्थापन कक्ष प्रमुख तथा पुनर्वसन अधिकारी यांनी केले आहे.

# प्रशिक्षणात जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अभिजीत राऊत झाले प्रशिक्षणार्थी

## शेजारी बसून त्यांनी पाहिला सराव अभ्यास



**लोकादेश न्यूज, किनवट : ८३-किनवट विधानसभा मतदार संघांतर्गत नियुक्त मतदान केंद्राध्यक्ष व अधिकारी यांच्या दुस-या प्रशिक्षण भेटी प्रसंगी जिल्हधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अभिजीत राऊत हे चक्क प्रशिक्षणार्थीच्या शेजारी बसून प्रशिक्षणार्थी झाले व त्यांनी सर्व नमुने सराव अभ्यासात भाग घेतला.**

मातोश्री कमलताई ठमके इंग्लिश मीडियम स्कूल येथे मतदान केंद्राध्यक्ष व अधिकारी यांच्या दुस-या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. यात पहिल्या सत्रात २ तास पीपीटी सादरीकरणाद्वारे प्रशिक्षण व पुढील १ तासात प्रत्येकी ४० प्रशिक्षणार्थी एका वर्गखोलीत मतदान यंत्र हाताळणी असे नियोजन होते. या प्रशिक्षणाची पाहणी करण्यासाठी नांदेडचे जिल्हधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अभिजीत राऊत (भाप्रसे) यांनी भेट दिली.

यावेळी सर्व क्षेत्रिय अधिकारी, सहायक क्षेत्रिय अधिकारी व मास्टर ट्रेनर वर्गखोली निहाय मतदान यंत्र हाताळणी प्रशिक्षण देत होते. त्यांनी थेट वर्गखोलीत प्रवेश करून प्रशिक्षणार्थीच्या बाकावर बसले. त्यावेळी मतदानाच्या दिवशी भरण्यात येणारी विविध नमुने कसे भरायचे ? या नमुन्यांचा सराव अभ्यास सुरू होता. त्यांनी ती प्रश्न पत्रिका-उत्तर पत्रिका पाहिली. ८३- किनवट विधान सभा मतदार संघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी कावली मेघना (भाप्रसे) यांच्या ह्या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक केले. मतदान प्रक्रिया संपवून साहित्य स्विकारतांना नोंदविलेल्या मतांचा हिशोब (१७-सी), मतदान केंद्राध्यांची दैनंदिनी व मतदार नोंदवही (१७-ए) सदोष आढळतात. परंतु अशा सराव अभ्यासाने त्या आता अचूक येतील असा आशावाद त्यांनी व्यक्त केला. याप्रसंगी मातोश्री कमलताई ठमके बहुद्देशिय सेवाभावी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अभि. प्रशांत ठमके यांनी त्यांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

# निवडणूक निर्णय अधिकारी कावली मेघना यांचा सर्व नमुने भरुन घेण्याचा सराव अभ्यास हा अनोखा स्त्युत्य उपक्रम

### -निवडणूक निरिक्षक (सामान्य) शैलेंद्र कुमार (भाप्रसे)




**लोकादेश न्यूज, किनवट : ८३-किनवट विधानसभा मतदार संघात मतदान केंद्राध्यक्ष व अधिकारी यांचेसाठी अत्यंत उत्कृष्ट प्रशिक्षण दिल्या जात असून निवडणूक निर्णय अधिकारी कावली मेघना यांनी सर्व नमने भरुन घेण्याचा सराव अभ्यास हा अनोखा स्तुत्य उपक्रम राबविला आहे. असे गौरोद्गार निवडणूक निरिक्षक (सामान्य) शैलेंद्र कुमार (भाप्रसे) यांनी काढले.**

मातोश्री कमलताई ठमके इंग्लिश मीडियम स्कूल , कोठारी (चि) येथे ८३- किनवट विधानसभा मतदार संघाकरिता नियुक्त करण्यात आलेल्या मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांच्या प्रशिक्षणास भेटी प्रसंगी ते बोलत होते.

प्रारंभी निवडणूक निर्णय अधिकारी कावली मेघना (भाप्रसे) यांनी त्यांचे पुष्पगुच्छ पगुच्छ देऊन स्वामत केले. यावेळी किनवटच्या तहसिलदार तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. शारदा चौंडेकर, माहूरचे तहसिलदार तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी किशोर यादव व किनवट नगर परिषदेचे मुख्याधिकारी डॉ. अजय कुरवाडे व मास्टर ट्रेनर उत्तम कानिंदे उपस्थित होते.

पुढे बोलतांना ते म्हणाले की, स्वातंत्र्याच्या ७२ वर्षीनंतर प्रथमतःच अतिदूर्गम वाघदरी गावात मतदान केंद्र देण्याचं महत्वपूर्ण काम सहायक जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी कावली मेघना (भाप्रसे) यांनी केले आहे. त्यांच्या नियोजनात आपणास उत्तम प्रशिक्षण दिलं जात आहे. आपण सर्वांनी इव्हीएम मशीन्स वारंवार हाताळाव्यात व मनात कसलीही भिती, शंका न बाळगता निर्भपण निवडणूक प्रक्रिया पार पाडावी.

# मतदान केंद्राध्यक्ष व अधिका-यांनी आयोगाच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करुन निर्भिड, निष्पक्ष, मुक्त वातावरणात निवडणूक पार पाडावी

### -निवडणूक निर्णय अधिकारी कावली मेघना (भाप्रसे)



**लोकादेश न्यूज, किनवट : सर्व मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांनी भारत निवडणूक आयोगाच्या सर्व मार्गदर्शक नियम व सूचनांचे काटेकोरणे पालन करून , कुठल्याही शंका मनात न ठेवता त्याचे निरसन करून विधानसभा निवडणून निर्भिड, निष्पक्ष, व मक्त वातावरणात यशस्वीपणे पार पाडावी. असे प्रतिपादन सहायक जिल्हाधिकारी तथा ८३-किनवट विधानसभा मतदार संघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी कावली मेघना (भाप्रसे) यांनी केले.**

मातोश्री कमलताई ठमके इंग्लिश मीडियम स्कूल, कोठारी (चि ) येथे आयोजित विधानसभा सार्वत्रिक निवडणूक- २०२४ करिता नियुक्त मतदान केंद्राध्यक्ष, प्रथम व इतर मतदान अधिकारी यांचे दुसरे निवडणूक प्रशिक्षणात त्या मार्गदर्शन करतांना बोलत होत्या.

यावेळी किनवटच्या तहसिलदार तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. शारदा चौंडेकर, माहूरचे तहसिलदार तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी किशोर यादव व किनवट नगर परिषदेचे मख्याधिकारी डॉ. अजय करवाडे यांनीही अनक्रमे टपाली मत प्रक्रिया , अभिरूप मतदान (मॉकपोल) व प्स बद्दल माहिती दिली.

प्रशिक्षण व्यवस्थापन कक्षाचे सहायक अधिकारी मास्टर ट्रेनर उत्तम कानिंदे यांनी मतदान केंद्रावर मतदान घेतानाच्या प्रत्येक टप्प्याची, मतदान यंत्राची, सर्व निवडणूक लिफापे व कागदपत्रे भरण्याची इत्यंभूत माहिती पॉवर पॉईंट प्रेझेन्टेशन (पीपीटी) द्वारे दिली. याकरिता संगणक चालक तथागत पाटील यांनी त्यांना सहकार्य केले. तसेच मास्टर ट्रेनर मल्लिकार्जून स्वामी यांनी इव्हीएम बद्दल माहिती दिली. त्यानंतर दुस्या सत्रात प्रत्येकी ४० प्रशिक्षणार्थी करिता एक वर्ग खोली याप्रमाणे क्षेत्रिय अधिकारी , सहायक क्षेत्रिय अधिकारी व मास्टर ट्रेनर यांनी सर्वांना मतदान यंत्र हाताळणीचे प्रशिक्षण देऊन प्रात्यक्षिक व नमने भरण्याचा सराव अभ्यास घेतला.

प्रशिक्षणाच्या पहिल्या दिवशी ८०९ मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिका्यांपैकी ७६६ हजर व ४३ गैरहजर होते ; तर दुस्या दिवशी ६८४ मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिका्यांपैकी ६४० हजर व ४० गैरहजर होते. अशाप्रकारे दोन्ही दिवशी १ हजार ४९३ पैकी १ हजार ४०६ हजर व ८७ जण गैरहजर होते. त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.

कक्ष प्रमुख नायब तहसिलदार रामेश्वर मुंडे, सर्व नायब तहसिलदार म. रफिक म. बशिरोद्दीन, विकास राठोड , आर.जी. राठोड , कैलास जेठे , महसूल विभागाचे के.डी. कांबळे, डी.सी.भरे, नरेश रोडे, प्रभू पानोडे, एन.एस. शिंदे, गोविंद पांपटवार तसेच प्रशिक्षण कक्षाचे सहायक अधिकारी / कर्मचारी : व्ही.टी. सर्यवंशी, मकेश कोल्हे , ए.जे. बोडकेवाड, बी.एल. काळे, रामदास शेंडगे, एम. के. सांगवीकर, डी.जी. क्षीरसागर, अमोल सुर्यवंशी, गणपत बोडके, शुभम राठोड, रवीदास आडे, कोमल भगत, गिता प्रधान आदिंनी प्रशिक्षणाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

# सहायक जिल्हाधिका-यांची मेघना कावली यांची धाडसी कारवाई

## अवैध वाळू तस्करी करणारी सहा वाहने जप्त..!



लोकादेश न्यूज, माहूर : माहूर तालुक्यातील वाळू चोरट्यांच्या अवैध वाळूउपसा व अवैध वाहतूक तस्करी करणारी सहा वाहने शुक्रवारच्या रात्री किनवटचे सहाय्यक जिल्हाधिकारी कावली मेघना यांनी व महसूल पथकाने रात्रीच्या वेळी पैनगंगा नदी पात्रातून वाळूची चोरटी वाहतूक करत असलेल्या चार टिप्पर आणि दोन ट्रॅक्टर जप्त केले. विधानसभा निवडणुकीच्या कामांमध्ये व्यस्त असलेल्या कर्मचा-यांचा फायदा घेत वाळू तस्करांनी आपले डोके वर काढले आहे. अचानकपणे केलेल्या ह्या कारवाई मध्ये महसूल विभागाला मोठे यश मिळाले आहे. या कारवाईमुळे वाळू माफियांत खळबळ उडाली. सहायक जिल्हाधिकारी मेघना कावली यांच्या मार्गदर्शनात महसूलच्या पथकाने शनिवारी माहूर तालुक्यातील नेर येथे वाळूची अवैध वाहतूक करणारी सहा वाहने जप्त केली.यावेळी नायब तहसीलदार मोहंमद रफीक, महसूल सहायक धोंड,वाहनचालक मगरे व सेवक शेळके यांनी आज मौ नेर ता. माहूर येथे अवैध वाळू वाहतूक करणारे ०६ वाहने पकडून तहसिल कार्यालय माहूर येथे जमा करण्यात आली आहे. पकडलेल्या वाहनांचे वाहन क्रमांक MH-06 AC 6754 -टिप्पर, MH-26 BE 4665-टीप्पर, MH-29 M 1634-टिप्पर, MH-26 AD 6839-टिप्पर, महिंद्रा कंपनीचे विना क्रमांकाचे लाल रंगाचे ट्रॅक्टर, सोनालिका कंपनीचे DI47RX सिकंदर निळ्या रंगाचे ट्रॅक्टर. किनवटचे सहाय्यक जिल्हाधिकारी कावली मेघनाय यांनी धाडसी कारवाई केल्याने वाळू तस्करांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. यावेळी सदरील वाळूघाटातू अनेक यंत्रांच्या मदतीने बेकायदेशीरपणे उपसा सुरु असल्याचे आढळले. या पथकाला पाहताच वाळू घाटातील दुस्या बाजूच्या वाळू तस्करांनी आपले ट्रॅक्टर घेऊन पळ काढण्यात यश मिळाले. वाळू माफियांविरोधातील मोहीम यापुढेही अशाच पद्धतीने सुरु राहणार आहे. अवैध उपसा व वाहतूक करणा-यांची कदापिही गय केली जाणार नाही, अवैध वाळू तस्करी करणा-यांवर कठोर कायदेशीर कारवाई करणार असल्याचे सहायक जिल्हाधिकारी मेघना कावली यांनी सांगितले.

# जिल्ह्यात जमावबंदी, शस्त्रबंदी आदेश लागू

**नांदेड दि. १६ नोव्हेंबर :- नांदेड जिल्ह्यात १८ नोव्हेंबर २०२४ चे सकाळी ६ वाजेपासून ते २ डिसेंबर २०२४ च्या मध्यरात्री पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहणार आहे, अशी माहिती अपर जिल्हादंडाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली आहे.**

जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून अपर जिल्हादंडाधिकारी यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) अन्वये जिल्ह्यात १८ नोव्हेंबरचे सकाळी ६ वाजेपासून ते २ डिसेंबर २०२४ रोजी मध्यरात्री पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहिल. त्यानुसार पाच किंवा पाचपेक्षा अधिक व्यक्तींनी या आदेशात नमुद असलेली कृत्ये सार्वजनिक परिसर किंवा त्याच्या जवळपास करण्यास बंदी घालण्यात आली आहे. हा आदेश कामावरील पोलीस अधिकारी, शासकीय कर्मचारी, विवाह, अंत्ययात्रा, धार्मिक कार्यक्रम, यात्रा व इतर सक्षम अधिकारी यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणुकांना लागू होणार नाही.

अशा मिरवणुकांना परवानगी देण्याचे अधिकार तसेच पाच व पाचपेक्षा जास्त इसम जमण्यासाठी, सभा, मिरवणुका, मोर्चा काढणे, ध्वनीक्षेपक वाजविण्यास परवानगी देण्याचे अधिकार जिल्ह्यातील पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना तसेच पोलीस अधीक्षक नांदेड यांनी प्राधिकृत केलेल्या इतर पोलीस अधिकारी यांना राहतील.




साप्ताहिक लोकादेशचे मालक, प्रकाशक, संपादक **साजीदोद्दीन शरफोद्दीन बडगुजर** यांनी मुद्रक **शेख राजीक शेख खाजामिया** यांच्या हिंदूस्थान ऑफसेट प्रिंटींग प्रेस, हनुमान मंदिर जवळ किनवट ता.किनवट जि.नांदेड-431 804 (महा.) येथे मुद्रित करून बडगुजर भवन मोमीनपुरा, किनवट ता.किनवट जि.नांदेड-431 804 (महा.) येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR/2007/20732 फोन/फॅक्स नं. (02469) 221666 भ्रमणध्वनी : 09850900628 ईमेल : sajidbadgujar@gmail.com, lokadesh@gmail.com